# जरा हळू!

दोन अंकी स्वतंत्र नाटक
लेखक : प्रल्हाद जाधव

पात्र योजना :

सुप्रिया - ३० वर्षे
आदेश - ३५ वर्षे
रामजी - ५५ वर्षे
सोनी - ५० वर्षे
प्रसाद - ०८ वर्षे

***

## अंक पहिला / प्रवेश पहिला

(प्रकाश येतो.नुकतेच उजाडले आहे.मध्य-मुंबईतील एका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट,अर्थातच हॉल. आदेश (३५)आणि सुप्रिया(३०) हे पती-पत्नी, बाहेर पडण्याच्या तयारीत.आदेश - देखणा, बुद्धिमान, समंजस. सुप्रिया- सुंदर, हुशार, थोडी तापट.दोघेही चांगले शिकलेले. आदेश एका कंपनीत प्रॉडक्ट डिझायनर तर सुप्रिया एका फर्ममध्ये इंटेरियर डेकोरेटर. हा त्यांचा स्वतःचा फ्लॅट. मालकीची गाडी आहे, बॅंकेत ठेवी आहेत. लग्नाला दहा वर्षे झाली आहेत.त्यांना प्रसाद हा आठ वर्षे वयाचा मुलगा. दोन दिवस विरंगुळा म्हणून आदेश-सुप्रिया पुण्याजवळील 'उंबरगाव-बंधाऱ्या'ला जायला निघाले आहेत.लोकांना विशेष ज्ञात नसलेले, आडवाटेवरचे 'उंबरगाव-बंधारा' हे गाव पक्षिनिरीक्षणासाठी प्रसिद्ध असणारे ठिकाण. तिकडे अडचण नको म्हणून आदेशने आपल्या मुलाला, प्रसादला तात्पुरते आपल्या आईकडे; ठाण्याला ठेवले आहे.
सुप्रियाने नुकतीच देवपूजा केली आहे. प्रार्थनेच्या काही ओळी गुणगुणत उदबत्ती घरभर फिरवून, देव्हाऱ्यासमोर लावत नमस्कार करते. 'आटपलं का तुझं?' असं प्रसादला विचारत आत जाते,आतून एक बॅग ओढत बाहेर आणून टेबलावर ठेवून सामान चेक करू लागते. 'हो हो, आटपलं, आटपलं' म्हणत दुसरी बॅग घेऊन आदेश बेडरूममधून बाहेर येतो.)
आदेश : अग हो हो,मी आणली असती ना बॅग, (घड्याळ पहात) कशाला घाई करतेस? वेळ आहे अजून! (तोही एकेक वस्तू बॅगेत भरू लागतो)
सुप्रिया : लांब जायचं आहे, थोडं लवकर निघालेलं बरं.
आदेश : काही उशीर होत नाही, इथनं अडीच तासात पुणं, तिथनं पुढं दोन-अडीच तासाचा प्रवास!
सुप्रिया : खरं आहे पण आपण 'प्रो-ॲक्टिव्ह' राहिलेलं बरं. रात्रीच बॅग भरून ठेवली होती मी, आता फक्त चेक करतेय एकेक वस्तू. तिथे गेल्यावर गोंधळ नको.
आदेश : मी सुद्धा पेट्रोल फुल करून ठेवलंय काल गाडीत, म्हणजे वाटेत कुठं थांबायची गरज नाही. टापोटाप निघू. टोलनाक्यावर झणझणीत मिसळपाव,आलं घातलेला चहा आणि मग डायरेक्ट 'उंबरगाव-बंधारा'!
सुप्रिया : (सावधपणे) गाडी अगदी हळू चालवायची बरं का आदेश! (क्षणभराचे सूचक संगीत)
आदेश : बस बस बस बस! अगदी आरामात जाणार आहोत आपण सुप्रे,काही काळजी करू नको तू. (हसतो)
सुप्रिया : थॅन्क्स!
आदेश : साडेबारा-एकपर्यंत पोचू. एक वाजता ज्वारीची भाकरी आणि ठेचा खात असू आपण रामजीच्या घरी.
सुप्रिया : सोबत तव्यावर फ्राय केलेला ताजा मासा, हे सांगायला विसरलास...
आदेश : (हसत) अरे हो की! आणि तो सुद्धा तिलापिया!
सुप्रिया : तिलापिया?

आदेश : हो. 'चिलापी' असंपण म्हणतात त्याला तिकडं. खूप काटे असतात त्यात पण चवीला एकदम फक्कड.
सुप्रिया : तू पण बरी एकेक ठिकाणं आणि माणसं शोधून काढतोस...
आदेश : अगं मी अजून काळा का गोरा बघितला नाही त्या रामजीला. आमचे सुपरवायझर देशमुख जाऊन आले तिकडे. त्यांनीच दिली माहिती!
सुप्रिया : मी म्हणत होते चांगली फॉरेन ट्रीप करू एखादी, पण नाही पटलं तुला.
आदेश : ती करू नंतर कधीतरी.आधी दोन दिवस डोकं शांत तर करून येऊ, किती दिवसात बाहेर पडलो नाही.
सुप्रिया : ते खरं आहे तुझं पण म्हणून काय फ्लेमिंगो बघायला एवढ्या लांब उंबरगाव-बंधाऱ्याला? शिवडीलापण दिसतात की ते!
आदेश : अगं तेवढंच आऊटिंग होतं, टूरिझमला चालना मिळते.गोरगरिबाला रोजगार मिळतो...आणि तू काहीही म्हण सुप्रिया,पण अशा आडगावी फिरण्यात जी मजा आहे ती कोणत्याही जगप्रसिद्ध ठिकाणी जाण्यात नाही.
सुप्रिया : बरं बरं भाषण थांबव तुझं. टूथपेस्ट आणि ब्रश घेतलास ना?
आदेश : (हसत) घेतलाय, घेतलाय...आणि पक्षिनिरीक्षणासाठी चाललोय आपण, ते पक्षी काही दात तपासणार नाहीत तिथं आपले - घासलेत की नाही म्हणून!
सुप्रिया : नेहमीचं आहे तुझं हे, मग आयत्यावेळी धावपळ सुरू होते तुझी.
आदेश : तुझं सामान भरलंस सगळं नीट?
सुप्रिया : मला आठवण करून द्यावी लागत नाही कसली. इमर्जन्सीसाठी गाजर-काकडी,लिंबू-कोथिंबीर, पोहे,साखर चहापावडर,पाण्याची पाच लिटरची बाटली घेतलीय. लिंबू कापायची सुरीसुद्धा घेतलीय… कधी काय प्रसंग येईल सांगता येत नाही.
आदेश : वेळ आली तर तिथं फ्लेमिंगोनासुद्धा लिंबू-सरबत करून देऊ शकतो आपण!
सुप्रिया : कांदेपोहेसुद्धा!(हसतात) चहा घेऊ या का एकदा?
आदेश : चहाला मी नाही म्हणतो का कधी?
सुप्रिया : (थर्मास उचलत) वाटेत लागेल म्हणून आधीच तयार ठेवला होता.
आदेश : (खूश होत) म्हणून तर बायकोला सहधर्मचारिणी म्हणतात!(ती त्याच्याकडे एक संशयमिश्रीत कटाक्ष टाकते. तो निर्मळ हसत मोबाईलवर काहीतरी पाहू लागतो)
सुप्रिया : (चहा देत) आता टाईमपास करत बसू नको ...
आदेश : (मोबाईलवरच) काही नाही, उंबरगाव बंधाऱ्या- विषयी गुगल काय म्हणतंय ते बघतोय.( मोठ्यानं वाचतो) "सह्याद्रीतील डोंगररांगांच्या पायथ्याशी निर्माण झालेला  नैसर्गिक जुळा बंधारा! (तिच्याकडे पहात तिला समजावून सांगत) जुळा म्हणजे एकाखाली एक असं दोन टप्प्यात पाणी साठतं तिथं… (पुन्हा मोबाईल मध्ये पहात) तीनशेहून अधिक प्रजातींचे पक्षी, अनेक प्रकारचे जलचर, वनस्पती, प्राणी, फुलपाखरं... पॅराडाईज ऑफ मायग्रेटेड बर्ड्स!"
सुप्रिया : बस, बस,बस - खूप झाली माहिती, राहण्याची  व्यवस्था नीट आहे ना मग झालं!
आदेश : हॉटेलं आहेत काही आजूबाजूला, पण रामजीच्या घरीच राहणार आहोत आपण. 'होम स्टे'! त्याचं घर वरच्या बंधाऱ्याच्या काठी,अगदी डोंगराला लागून आहे, त्यामुळे स्पॉट-व्हिजिटसाठी जाण्यायेण्याचा वेळ वाचेल आपला. स्वतःची होडी आहे त्याची.आणि विशेष म्हणजे पक्षी- प्राण्यांचं, निसर्गाचं उत्तम ज्ञान आहे त्याला!
सुप्रिया : मला काय कळतंय म्हणा त्यातलं!
आदेश : बंधाऱ्याच्या वर आणि खाली, दोन्ही भागात फिरवणार आहे तो आपल्याला. दोन्हीकडे भरपूर पाणी आहे यंदा असं म्हणत होते देशमुख. हजारो फ्लेमिंगो आलेत असा रिपोर्ट आहे...
सुप्रिया : (बॅग उचलत) चला, निघू या?
आदेश : येऽऽस...(चहा संपवून कप टेबलावर ठेवतो, इतक्यात त्याचा फोन वाजतो, त्याच्या आईचा फोन.)
आदेश : ('अरे सकाळी सकाळी आईचा फोन?'असं म्हणत फोन घेतो) बोल आई, काय म्हणतेस? प्रसादनं काही गडबड तर केली नाही ना?
आवाज : अरे त्यासाठीच फोन केलाय, घरी जायचंय लगेच म्हणून हट्ट धरून बसलाय.
आदेश : अगं, कालच तर सोडून गेलो त्याला तुझ्याकडे. दोन दिवसांचा प्रश्न आहे फक्त. खरंतर आजची रात्र! उद्या संध्याकाळी येऊन घेऊन जातो त्याला.

आवाज : पण तो ऐकत नाही अजिबात, आरडाओरडा करतोय. काय करू कळत नाही.
आदेश : तुला माहिताय ना त्याचा स्वभाव आई? थोडा वेळ गडबड करेल आणि मग होईल शांत...त्याला आठवण करून दे - येताना ड्रायफ्रूट चिक्की आणि एक मोठा टेडी बेअरपण आणणार आहोत त्याच्यासाठी.
आवाज : अरे काहीही ऐकत नाही तो, आणि या वेळी जरा अतीच चाललंय त्याचं. अंगावर येतोय...
आदेश : प्लीज आई...थोडा वेळ खाली गार्डनमध्ये घेऊन जा ना त्याला, तिथली घसरगुंडी बघितली की खूष होतो तो! ( प्रश्नार्थक चेहऱ्यानं सुप्रियाकडे पाहत 'काय करायचं' असं विचारतो. ती हाताने खुणा करत 'नंतर घेऊन जाऊ' असं सुचवते.) बॅगापण भरून झाल्यात आमच्या आणि खाली उतरत होतो आम्ही आता ...
आवाज : सगळं सामान उचकलंय घरातलं, भांडीकुंडी फेकून देतोय…
आदेश : बोलू का मी त्याच्याशी? (मोबाईल पाहत) थांब त्याच्याच फोनवर लावतो!
आवाज : फोन बंद करून ठेवलाय त्यानं...आणि नाहीच बोलायचं म्हणतोय!
आदेश : (नाराजीने) मग कॅन्सल करू का जायचं आम्ही? जाऊ नंतर कधीतरी… (काही क्षण शांतता)
आवाज : कॅन्सल करा असं म्हणत नाही मी, करतेय जमेल तेवढं, पण अंथरूणातच शी करून ठेवली त्यानं आज...
आदेश : च् … मी कॅन्सल करतो ट्रीपचं आणि येऊन घेऊन जातो त्याला लगेच!
आवाज : कॅन्सल करा असं म्हणत नाही मी… पण  खरं सांगायचं तर झेपत नाही रे हल्ली मला...
प्रसाद : येतो म्हटलं ना मी आई!
आवाज : नको…नको येऊ,घेऊन जाते मी त्याला बागेत… बघते प्रयत्न करून. या तुम्ही जाऊन!
आदेश : नक्की म्हणतेस ना आई?
आवाज : हो,पण उद्या जितकं लवकर निघता येईल तितकं निघा म्हणजे झालं!
आदेश : हो, हो, नक्की. थॅन्क्यू ... थॅन्क्यू सो मच!
आवाज : अरे आईला काय थँक्यू म्हणतोयस? नीट जा आणि नीट परत या म्हणजे झालं!
(तिकडून फोन बंद होतो)
सुप्रिया : (तडकलेली) मला वाटलंच होतं की काहीतरी आडकाठी आणणार ह्या !
आदेश : काय मुद्दाम फोन केला नाही तिनं. तुला माहिताय ना प्रसादचा मूड किती पटापट बदलतो ते!
सुप्रिया : हो, पण त्यानाही माहीत आहे ना ते?
आदेश : हो, पण तिला झेपलं तर पाहिजे ना?वय किती आहे तिचं!
सुप्रिया : नातवाचंच करायचं आहे ना पण, कोणी परका तर नाही ना?
आदेश : अगदी ड्यूटी असल्यासारखं बोलतेस तिची!
सुप्रिया : एवढे उपकार करणार होत्या तर फोन तरी कशाला करायचा?
आदेश : तरी मी तुला सांगत होते की त्यालाही बरोबर घेऊन जाऊ आपण म्हणून! काय बिघडलं असतं?
सुप्रिया : दोन दिवस शांततेत राहता यावं एवढीच अपेक्षा होती माझी, पण तेही दिसत नाही नशिबात... काय उपयोग आहे त्या कमाईचा आणि त्या नोकरीचा?
आदेश : झालेय ना आई तयार आता? उद्या लवकर निघू थोडं म्हणजे झालं... आणि यापुढे प्रसादला असं एकट्याला सोडून कुठेही जायचं नाही.
सुप्रिया : (रागातच) बोलले असेन कधीतरी एखादवेळे... तेवढंही स्वातंत्र्य नाही का मला?
आदेश : चर्चा नको... डोक्यातनं काढून टाक तो विषय!
सुप्रिया : जशी काही मीच शत्रू आहे त्याची! (तणावपूर्ण शांतता) इतकी वर्षे कोण करतंय त्याचं?
आदेश : (तिच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत फोनवर)  हॅलो नमस्कार, कोण रामजीकाका बोलताहेत ना? मी आदेश बोलतोय मुंबईवरून...बरोबर, बरोबर! आज आणि उद्या दोन दिवसांचं बुकिंग आहे आमचं. बरोबर, बरोबर! आता निघतोय मुंबईतनं, साडेबारा एकपर्यंत पोचतो. हा नंबर सेव्ह करून ठेवा माझा,ओके? भेटूया, बाऽऽय...(फोन बंद करत) चलो!
सुप्रिया : (अजूनही घुश्यातच) अगदी डोक्यातच जाते ही बाई माझ्या...
आदेश : पुन्हा तेच? विषय काढून टाक म्हटलं ना डोक्यातनं!
सुप्रिया : कालच सांगितलं असतं तर दुसरी काही व्यवस्था केली नसती आपण? आणि हे पोरगंपण असं आलंय नशिबाला की जरा कुठं काही करायला जावं की नेमकं आडवं येतं!

आदेश : अगं त्याला काय कळतंय आपण काय करतोय ते. आणि ऑटिझमवर काहीही उपाय नाही जगात हे हजारवेळा सांगून झालंय तुला!
सुप्रिया : पण काही मनासारखं करायला जावं तर तिथंच नेमका का तडफडतो हा? इतरवेळी कसा देवासारखा शांत असतो अगदी?
आदेश : पुन्हा तेच!
सुप्रिया : कोणत्या जन्माची पापं फेडतेय तेच कळत नाही.
आदेश : यात पाप-पुण्याचा काय प्रश्न आहे?... कितीतरी घरात असतात अशी मुलं. करतात ना आईवडील त्यांचं सगळंकाही!
सुप्रिया : करण्याचं म्हणत नाही मी, पण हा टायमिंग कसं परफेक्ट साधतो अगदी?
आदेश : अगं सांगितलं ना, त्याला काय कळतंय त्यातलं? सुप्रिया : (घुश्शातच) जरा कुठं पाय मोकळे करायला बाहेर पडावं, खरेदीला निघावं, क्लायंटला भेटायला जावं तर प्रत्येक ठिकाणी आडवा येणार हा! नाटक - सिनेमा बघायला जावं तर थिएटरमध्ये याचा फोन. मग ते मध्येच सोडून घरी परत जायचं...
आदेश : अगं हो हो…
सुप्रिया : तुला माहिताय ना की 'इंडस मॉल'चं इंटेरियर चाललंय सध्या. रात्रंदिवस काम सुरू आहे. सारा स्टाफ काम करतोय तिकडं… श्वास घ्यायला फुरसत नाही ऑफिसात - आणि तुम्ही जरातरी काही सुचू देताय का?
आदेश : (शांत)
सुप्रिया : 'यलो पिकॉक अॅवार्ड'साठी एण्ट्री टाकलेय हे माहीत आहे ना तुला? आयुष्याचं स्वप्न आहे ते माझ्या!
आदेश : (समंजसपणे) आय नो सुप्रिया! आणि एक दिवस ते अॅवॉर्ड मिळवल्याशिवाय राहणार नाहीस तू हेही माहित आहे मला!
सुप्रिया : (अजूनही संतापलेली) याच्या भीतीनं परवा इंटेरियरचं एक मोठं कॉन्ट्रॅक्ट सोडावं लागलं, कंपनीच्या खर्चानं होणाऱ्या फॉरेन ट्रीपवर पाणी सोडावं लागलं... व्हॉइस प्रेसिडेंटचं प्रमोशन तर चार-पाच वेळा सोडलंय मी याच्यासाठी!
आदेश : (समंजसपणे) जरा क्रिएटिव्हली प्लॅनिंग केलं की जमू शकतं सगळं!
सुप्रिया : म्हणजे एखादं काम हाती घ्यायचं तर आधी याची परवानगी घ्यायची, असंच म्हणायचं ना तुला?
आदेश : तू लावतेयस तसा अर्थ! ट्राय टू बी अ पार्ट ऑफ सोल्यूशन... दृष्टिकोन बदलला की चित्रं बदलतं सगळं.
सुप्रिया : काय बदलतं चित्रं? याला कुठं घेऊन जावं तर चारचौघात, तर तिथं घाण करून लाज नाही काढत हा आपली?
आदेश : अग हो हो, काय झालं एवढं संतापायला? एवढी मोठी इंटेरियर डेकोरेटर तू! अडगळीची आणि टाकावू स्पेससुद्धा सुंदर करून दाखवणं हे तुझं काम. इथं तर एक जिवंत गोष्ट, स्वतःचं मूल समोर आहे...एक संधी म्हणून बघितलं पाहिजे त्याच्याकडं हे लक्षात येत नाही का तुझ्या?
सुप्रिया : (आणखी तापत) मला शिकवू नको तू! तू एवढा मोठा प्रॉडक्ट डिझायनर, पण पोटच्या पोराचं प्रॉडक्ट नीट डिझाईन करता आलं नाही तुला! मुलासाठी इतकी घाई झाली होती, जरा थांब म्हटलं तर थांबलास?
आदेश : डोन्ट बी सो सिली! अँड माइंड वेल - तुझ्या गरोदरपणात प्रत्येक क्षणी तुझ्या बरोबर होतो मी! 'ती इमर्जन्सी' कशी आली होती रात्रीच्या वेळी ते आठवतंय ना? कोणी निस्तरलं त्यावेळी सगळं?
सुप्रिया : म्हणजे मीच कारण होते त्या इमर्जन्सीसाठी असं म्हणायचंय ना तुला?
आदेश : ओ माय गॉड! कसं बोलावं तुझ्याशी!
सुप्रिया : तेच म्हणतेय मी, काहीएक कळत नाही मला. माठ आहे मी अगदी! सगळा दोष काही तो माझाच!
आदेश : (तापत) आणि प्रॉडक्ट डिझाइनचं तू शिकवू नको मला. त्यासाठी तशी क्रिएटीव्हिटी असावी लागते माणसाजवळ!
सुप्रिया : तू शिकव मला!
आदेश : पुस्तकात शिकून मिळत नाही ती! समाधानी असावं लागतं त्यासाठी,डोकं शांत ठेवावं लागतं,पेशन्स लागतात.साध्या-साध्या गोष्टीत आनंद शोधण्याचा निर्मळपणा असावा लागतो माणसाजवळ...
सुप्रिया : तेच सांगतेय ना मी! डोकं नावाची काही गोष्टच नाही माझ्याजवळ! पेशन्स तर अजिबातच नाहीत!
आदेश : काय चाललंय तुझं हे सकाळी सकाळी? जायचं नाही का बाहेर? का तमाशा करतेयस उगाचच?

सुप्रिया : मी नाही तमाशा करत.
आदेश : मग कोण करतंय? काय हवंय तुला?
सुप्रिया : तू काय देणार, साधा पासवर्ड देत नाहीस लॅपटॉपचा...(हलकंसं संगीत.आदेश संयमाने शांत… काही क्षणांनी सुप्रिया घाव घातल्याप्रमाणे) तुझी ही डबल डिप्लोमसी चांगली माहिताय मला, तिकडं ऑफिसला जाऊन काय काय धंदे करत असशील ते त्या परमेश्वरालाच माहीत!
आदेश : (शांतपणे ) मी कधीच अडवलेली नाही तुला... जा मला सोडून हवं तर!
सुप्रिया : दुसरं लग्न करण्याची स्वप्नं बघतोयस तू पण ती संधी देणार नाहीये मी तुला.
आदेश : मुलाचं लोढणं कसं सांभाळायचं हा  खरा प्रॉब्लेम आहे तुझा! पण घाबरू नकोस तू,मी तयार आहे त्याला सांभाळण्यासाठी! बरोबर करीन मी सगळं त्याचं!
सुप्रिया : मी कधीही तसं म्हटलेलं नाही.
आदेश : म्हणायला कशाला हवं, दिसत नाही का ते! आणि मी जर बाप आहे त्याचा तर आईसुद्धा होऊ शकतो हे लक्षात ठेव!
सुप्रिया : दुसरी आईपण तयार असेल की त्याच्यासाठी!
आदेश : सुप्रिया प्लीज ...
सुप्रिया : (धोरणी समजूत दाखवत) ओके, ओके!
आदेश : (शांत) दुसऱ्या मुलाचा पर्यायद्धा अनेकदा ठेवलाय मी तुझ्यासमोर! पण करिअरच्या नादात आता तुला तेही नको झालंय!
सुप्रिया : हा एक सांभाळता सांभाळता नाकी नऊ येताहेत, आणखी कुठे एक गळ्यात बांधून घेऊ? घरदार सांभाळा, ऑफिस सांभाळा...
आदेश : आणि मला नाही ऑफिस? मला नाही घरदार,पण रडत बसतो का मी कधी तुझ्यासारखा? (शांतता)
सुप्रिया : (काही क्षणांनी) माझी तयारी झालीय सर्व…
आदेश : तिथं अशीच भांडत बसणार आहेस का तू?
सुप्रिया : न भांडता एक दिवस तरी गेलाय का आपला?
आदेश : म्हणजे इकडून तिकडं फक्त शरीरानं जाऊन पडायचं, एवढंच ना?
सुप्रिया : नाहीतरी मला तुमच्या त्या डोळे फाडफाडून पक्षी बघण्याच्या फालतू उद्योगात इंटरेस्ट नव्हताच कधी!
(आदेशच्या मोबाईलची रिंगटोन वाजते.तो फोन घेतो.)
हॅलो नमस्कार!
रामजी (आवाज) : राम राम!
आदेश : कोण बोलतंय?
रामजी (आवाज) : म्या रामजी, उंबरगाव-बंधारा!
आदेश : हां आलं लक्षात.
रामजी (आवाज) : तुमचाच फोन आला व्हता का हे बघायचं व्हतं…
आदेश : हो हो, माझाच फोन आहे, निघतोय आम्ही आता! घराजवळ आलो की पुन्हा फोन करतो.
रामजी (आवाज) : बरं बरं, रामराम!
आदेश : (फोन बंद करून खिशात ठेवत समजूतदारपणे) आता इतकी तयारी केलीय तर जाऊन येऊ…
सुप्रिया : माझीही काही हरकत नाही.एकमेकांशी अजिबात न पटणारी जोडपीसुद्धा खूप दिसतात की अशा ठिकाणी, चला!
( एक दुखरा, दर्दभरा आलाप…बॅग उचलून निघते. निघताना आठवणीनं देवाला नमस्कार करते. अंधार होऊ लागतो. गाडी स्टार्ट झाल्याचा आवाज. मग गाडी हळूहळू दूर जात आहे. पूर्ण अंधार.)

अंक पहिला / प्रवेश दुसरा अ

( हळूहळू प्रकाश. डोंगरउतारावरचं रामजी आणि सोनीचं छोटं लॉज-वजा घर. रामजी (५५) काळा-सावळा, राकट-रांगडा, दहावी-बारावीपर्यंत शिकलेला. संवेदनशील पण सणकी गडी! सोनी (५०) नाकीडोळी छान, सावळी,

सही करण्यापुरती शिकलेली, मेहनती, स्वभावानं भाबडी गृहिणी. त्यांच्या घराची मागील बाजू स्टेजवर दिसते. एकीकडे गेस्टसाठी किचन-बेडरूम तर दुसरीकडे

रामजीचे किचन-बेडरूम. पाहुण्यांच्या बेडरूममधून प्रेक्षकांच्या दिशेने एक पायरी उतरून खाली येता येईल अशी कॉमन पडवी. पडवीला एक आडवा ओटा. त्यावर बसून गप्पागोष्टी करता येतात. मासे धरण्याचे जाळे, टोपली, भोपळ्याची सांगड, जाड दोरखंडाचे वेटोळे अशा गोष्टी भिंतीवर लटकवलेल्या दिसतात. पडवीतून एक पायरी खाली उतरले की अंगणासारखी छोटी मोकळी जागा. त्या जागेला लागून थोड्या अंतरावर, प्रेक्षकांच्या बाजूला फुटभर उंचीचे एक लोखंडी रेलिंग. त्या पलीकडे जलाशय,अशी कल्पना! वेळ आली तर अंगणात खुर्च्या टाकून पाहुणे बसू शकतात, तेथेही चहापान-गप्पा शक्य! पडवीतून खाली उतरून पर्यटक थेट जलाशयाकाठी फिरण्याचा आनंद घेऊ शकतात. किचनच्या बाजूचे पडवीचे जोते आत विंगेत पोचलेले. त्याची आतील हद्द पाण्याला टेकलेली. तिकडे रामजी आपली होडी बांधून ठेवतो. दुसऱ्या भागात पाहुण्यांची बेडरूम. मध्ये भिंत. पाहुण्यांच्या बेडरूममागे हॉल. अर्थात तो स्टेजवर दिसत नाही. किचन-बेडरूमच्या मागे विंगेत अंगणासारखी छोटी मोकळी जागा. तिकडे सोनीने भाजीपाला लावला आहे. भविष्यात त्यांना तिकडे आणखी एखादी खोली बांधायची आहे.

तिकडेच वरच्या बाजूला गोठा. अर्थात तो गोठा,होडी किंवा पाणी स्टेजवर दिसत नाही… छान प्रसन्न संगीत. मधूनच गायीच्या हंबरण्याचा आणि कुत्र्याचा भुंकण्याचा आवाज.)

सोनी : (हातातील सुपासह पडवीत डोकावत) अवो, आईकलं का ऽऽ? काय म्हणते म्या, काय करताव? अवो ऽऽऽ, कुठं गेले हे? वो ऽऽ रामजीबुवा ...

रामजी : (फडक्याने हात पुसत विंगेतील पडवीकडून आत येत) आलू आलू ...काय झालं तुला एवढं बोंबलाया? पाणी साठलं व्हतं व्हडीत ते काढून टाकलं. भोक पडलं व्हतं कोपऱ्यात चांगलं करंगळीएवढं!

सोनी : (पडवीत उतरत) अग बाय, खरं का काय?

रामजी : घाबरू नगं, प्लास्टिकचा बोळा भरलाय तिथं आणि गरम डांबर वतलंय वरनं, बघाया नको आता चार म्हैने...

सोनी : मंग ठीक हाय.

रामजी : हा सीझन जाईल नीट असं वाटतंय सोने, चारपैशे आले हाती तर पुढल्या साली नवी व्हडी इकत घेऊ आपण.

सोनी : व्हईल समदं यवस्थित.पक्षी भरपूर आलेत आवंदा. बयाणापण चांगला मिळतोय लोकांचा. वाढंल गर्दी हळूहळू.

रामजी : जाळं फाडून ठेवलंय मगरीनं ते दुरुस्त करायचं हाय... छप्परपण दुरूस्त करून घ्यावं लागंल यंदा... आन् हिकडं ती खोली वाढवायची पडलीय ते अजून येगळंच!

सोनी : (एकदम) बरं ती खोली वाढवा नंतर, आधी जरा पाणी दावा कपिलेला!

रामजी : दावलं व्हतं की सकाळी!

सोनी : (कावत) अवो,दुपार झाली आता, सकाळची गोष्ट काय करतायसा? तहानली आसंल बिचारी...

रामजी : (अनिश्चेने) ह्होऽऽ, लय मोठी गायवाली!

सोनी : दोन जिवांची हाय ती आता, कसं कळंना तुमाला!

रामजी : म्या व्हडी दुरूस्त करीत व्हतो, तू ठिवली असतीस एक बाल्डी भरून तं हात मोडलं आस्तं का तुझं?

सोनी : उगा तोंड चालवू नका, म्या काय रिकामी बसली न्हाय हितं. कमरंचा काटा ढिला व्हतुय काम करता करता. गुराढोराचं, कुत्र्याकोंबड्याचं, आल्यागेल्याचं समदं म्याच करायचं ... (गायीच्या हंबरण्याचा आवाज येतो. ती त्याच्याकडे नाराजीने पाहते-)

रामजी : (बादली उचलत) बरं बरं, दावतो पाणी. लगीच भाषण करू नगं!

सोनी : म्या न्हाय करीत, तुमीच बोलायची येळ आणता माझ्यावर!

रामजी : (आत जाताना गेस्ट-रूममध्ये नजर टाकत) गादीवरच्या चादरी बदलल्यास?

सोनी : व्हय, बदलल्या की!

रामजी : उशांवर खोळी घातल्यास?

सोनी : व्हय.

रामजी : पाण्याचा तांब्या-पेला भरून ठिवलास?

सोनी : सगळं यवस्थित करून ठिवलंय आगदी.
रामजी : आन् सैपाकाचं काय?
सोनी : तयार हाय समदं... माशे तळायचे ऱ्हायलेत बाकी!
रामजी : चांगले मस्त तळून काढ आगदी. ह्या लोकाना खुश ठेवलं तर मुंबईत चांगली जाहिरात व्हईल आपली.
सोनी : तुमी नगं मला शिकवू! माझ्या हातचा मासा खाल्ला तर जलमभर इसरत नाय माणूस! निस्ती ठेचा-भाकर दिली तरी खुळी व्हतात ही मुंबई-पुण्याची माणसं.(रामजी जातो आणि गायीला पाणी ठेवून बाहेर येतो, तोवर सोनी सुपातले तांदूळ निवडत आहे, हलकंसं संगीत)
रामजी : (येत) सोने?
सोनी : काय वं?
रामजी : वियाला झाली आता कपिला.
सोनी : व्हय, आठ-धा दिसात घालंल ती वासरू...कालवड व्हावी आसं लय वाटतं मला,पर पांडुरंगाची विच्छा!
रामजी : तेच म्हणतोय म्या, पर ते काय आपल्या हातात हाय का?
सोनी : सुटली एकदा माऊली हातीपायी धड की आपणपण सुटलो... मंग काय याप नाय डोक्याला...
रामजी : खरं हाय, आन् हिकडं एवढी एक खोली वाढवली की कायमची चिंता मिटली आपली. मग राज्या-राणीगत राहायचं आपण! (हसतो)
सोनी : त्या इंजनेर भाऊसाहेबाला पैशे देयाचे ऱ्हायलेत. सारखा फेऱ्या मारतोय. (समोरच्या रेलिंगकडे बोट दाखवत) परवानगी नसताना हे बांधकाम का केलं म्हून दम देत व्हता परवा.
रामजी : त्या साल्याचं पोट भरतच नाय कधी... एवढे पैशे खातो तरी नोटीस पाठवली-बांधकाम तोडा म्हून! चॅयचं बेणं त्याच्या…
सोनी : मोठ्या सायबांशी बोलून बघा एकडाव!
रामजी : ते पण ह्यांचेच भाऊ सगळे! आतनं मिळालेले असतात… बंधारा दुरुस्तीच्या नावाखाली इस्कोट करून टाकलाय समदा डोस्क्याचा! वरचा बंधारा दुरुस्त करून तिथे धरण बांधायचं चाललंय… काय गरज होती तेच कळत नाय मला. स्वतःचं पोट मारून पैशे चारायचे ह्यांना! (एकदम तडकत) आन्  तू ज्यादा ढिल देऊ नको त्या भाड्याला!
सोनी : म्या काय केलं, का माझ्यावर डाफरताय उगीच?
रामजी : त्याला सरळ सांगायचं, 'मालक नाही घरात, ते आल्यावर बघा काय ते!' तर तू आपली त्याला च्या दे, पाणी दे, काकडी दे, पडवळ दे… आसं सुरूच तुझं!
सोनी : अवो सरकारी माणूस हाय त्यो, कधी डसंल सापागत कळणारपण नाही म्हणून ठेवती म्या त्याला गोड… ज्याचं करावं भलं तो म्हणतो माझंच खरं! (डिवचत) पुढं खोली वाढवायची हाय नव्ह?
रामजी : ते बघीन म्या काय करायचं ते! काय उपाशी मरत न्हाय आपण नाय वाढिवली तं ! पण म्या नसताना हितं उभा करायचा नाय त्याला... नायतर माझ्यासारखा वाईट नाय कोण मग!
सोनी : बघतोयस ना पांडुरंगा ! हितं ऱ्हायाचं म्हजी तोंड दाबून बुक्क्याचा मार !
रामजी : मं जा की कुठं जायाचं ते!
सोनी : उडीच मारती एक दिस पाण्यात आन् देती जीव!
(रामजी चमत्कारिकपणे हसू लागतो.त्याला काहीतरी आठवले आहे.) कधी टकूरं फिरंल ह्या माणसाचं सांगता येत न्हाय.आता उठताय कामाला का बसताय हितंच येड्यागत हसत?
रामजी : आता काय ऱ्हायलं आजून?
सोनी : (टोपली देत) चार लिंबं काढून आणा, ही घ्या! पेरूपण काढून आणा चांगले धा बारा!
रामजी : काढले असते की जेवण झाल्यावर...
सोनी : मंग येळ न्हाय मिळणार ते लोक आलं की, बघा वाजलं किती ते!
रामजी : (आकाशाकडे पाहात अंदाज घेत) अगं खरंच एक वाजत आला की बोलता बोलता ...येत्याल ते एवढ्यात. (बाहेरून मोत्याचं भुंकणं ऐकू येते) आता हा का भुकतोय ल्येकाचा? (त्याच्यावर ओरडत ) काय रं मोत्या, काय झालं एवढं भुकायला? (पाठोपाठ गाडीचा, हॉर्नचा आवाज)
सोनी : अग बाय, आले वाटतं …

रामजी : म्या घेऊन येतो त्यास्नी. (टोपली परत करत) ही घे, पेरूचं आणि लिंबांचं बघ तूच काय ते!
सोनी : (टोपली घेत वस्सकन) कधी एक काम सांगितलं तर नीट करायचा नाय माणूस हा! जावा ऽऽऽ ( ती लगबगीने परसदारी आणि रामजी बाहेर जातो.अंधार.)

अंक पहिला / प्रवेश दुसरा / ब

(प्रकाश येतो. पडवी-अंगण. साऱ्यांचं जेवण झालं आहे. आदेश आता हाफ पँट, टी शर्ट, पी-कॅप, गळ्यात कॅमेरा अशा तयारीत.सुप्रियाही तशीच तयार झालेली. दोघांनीही स्पोर्ट्स शूज घातले आहेत. सुप्रिया या चेंजमुळे चांगलीच एक्साईट झालेली. रेलिंगजवळ उभी राहून उत्सुकतेने परिसर न्याहाळत आहे.)
आदेश : (रुमालाला हात पुसत) फार जबरदस्त झालं होतं जेवण सोनीमावशी! व्वा, क्या बात है!
सुप्रिया : खरंच, तिलापिया अगदी छान तळला होता तुम्ही. मी पहिल्यांदाच खाल्ला हा मासा. जाताना रेसीपी घेऊन जाणार आहे, द्याल ना?
सोनी : रेश्पी?
सुप्रिया : तो पदार्थ कसा तयार करायचा याची माहिती!
सोनी : आसं व्हय,देईन की... आगदी नक्की!
सुप्रिया : हाताला अशी चव आहे तुमच्या की प्रेमातच पडावं अगदी! आय ॲम टोटली सोल्ड आऊट!
रामजी : (न उमजून) म्हजी कसं म्हणता?
सुप्रिया : तुमचं जेवण, हे घर, आणि हे लोकेशन बघून जीव अगदी खूश झाला बघा!
रामजी : हितं आलं की समद्यांचं आगदी आसंच व्हतंय. अन् सोनीच्या हातचं जेवण खाणारा माणूस तर जलमभर इसरूच शकत न्हाय तिला!
सोनी : उगा कौतिक नग करूसा (सुप्रियाला) रातच्याला काय करू जेवायला सांग ग पोरी!
सुप्रिया : झुणका-भाकर आणि ठेचा!
आदेश : पण सोबत तिलापिया पाहिजेच!
सोनी : बरं बरं! पर बरं का, बागेत वांगी हायेत आपली. भोपळा,घोसाळी,भेंडी, काकडी,कारली,पडवळ…
समदं घरचंच हाय.आमची म्हाडीची भाकरी आन् ढेमशाची भाजी खाल तर मुंबैचं नाव नाय काढणार परत कवा!
रामजी : (हसत) बरं बरं, उद्या कर तुला काय करायचं ते शाकाहारी जेवण.
सुप्रिया : हो,चालेल. तुमची ती बागपण बघायची आहे आम्हाला.
सोनी : दावती संध्याकाळी तुमी फिरून आल्यावर…
(सुप्रियाच्या समोर एक ताटली धरत) घे पोरी ...
सुप्रिया : काय आहे?
सोनी : पेरू...
सुप्रिया : अय्या ऽऽऽ,ओ माय गॉड!
सोनी : आपल्याच बागेतलं हायेती,आताच काढून आणले नव्हं का?
सुप्रिया : वा वा, देव भलं करो तुमचं! क्या बात है!
आदेश : (एक फोड उचलत) ओ थॅन्क्यू!
सोनी : तुला काय मूलबाळ पोरी?
आदेश : एक मुलगा आहे.
सोनी: आरं व्वा!
सुप्रिया: प्रसाद! आठ वर्षांचा आहे.
रामजी : मग आणायचा की त्यालापण. ज्याक मजा झाली असती त्याची.
सुप्रिया : आणला असता पण जरा प्रॉब्लेम आहे त्याचा.
रामजी : आता पोर म्हनलं की काहीतरी प्राब्लेम हा आलाच!

सुप्रिया : तसं नाही याची केस जरा वेगळीच आहे. म्हणजे शरीरानं वाढतोय पण डोक्यानं अधू आहे थोडा, कधी एकदम शहाण्यासारखा वागतो तर कधी कधी काहीच कळत नाही त्याला आपण काय करतोय ते! आम्हालाच करावं लागतं मग सगळं त्याचं.
सोनी : हात्तीच्या, हितं आमी केलं असतं की! पुढच्या येळी याल तवा नक्की घेऊन या...फुलाला आकाश आन मुलाला आयबाप आसल्याशिवाय काही खरं नसतं बरं का पोरांनो!
आदेश : (उस्फूर्तपणे) व्वा!
रामजी : आता हेच बघा ना... अंगणातलं हे साधं फूल, पण उजाडल्याशिवाय फुलतं का ते कवा? नाय ना? एवढुशा फुलाला हे एवढं मोठं आभाळ लागतं फुलाया तर मुलाला आयबाप नको वाढीसाठी?
आदेश : किती छान बोललात हो तुम्ही!
रामजी : (निघत) बरं चला आता.नोकरी-धंद्याचं टेन्शन सगळं इसरून जा आणि निसर्गाचा आनंद घ्या भरपूर. (दाखवत) हे बघा - हा खालचा दगडी उंचवटा आणि बाजूचा तो झाडाचा बुंधा दिसतो का न्हाय, त्याला वळसा घालून आपण फुडं जाणार. वरच्या आन् खालच्यापण अंगाला मायंदाळ पाणी साठतंय… पंचक्रोशीतल्या समद्या हिरींना वर्षभर पाणी असतंय खाली…
आदेश : अरे वा क्या बात है!
रामजी : समदं चांगलं चाललं व्हतं पर शेवटी सरकारची वाकडी नजर पडायची ती पडलीच! बंधारा मोडून मोठं धरण बांधायचं चाललंय, कॅनॉल काढून खाली शेतीला पाणी देयाचं म्हणत्यात! काय ते 'जागतिक दर्जाचं पर्यटन स्थळ' का काय म्हणतात तसं करायचंय हितं त्यांना.
आदेश : अच्छा!
रामजी : लांबलांबचे लोक पक्षी बघाया यावेत हितं आणि त्यातनं बक्कळ पैसा मिळवावा असा डाव हाय सरकारचा. वाळू, शिमीट,लोखंड ढिगानं आलंय. मोठमोठ्या जेशीबी, डंपर येऊन पडल्याती आजूबाजूला. रोज काय ना काय तरी धडाम धुडूम सुरूच हाय हल्ली. जमिनीत भुयार करतायंत मोठं… सुरंग लावतायंत रोजच्या रोज…जमीन हादरती रात्री-बेरात्री! काय व्हणार पुढं आमचं कळत नाय…प्राणी-पक्षांचा वावरपण कमी झालाय त्यामुळं.
आदेश : पण तुम्ही विरोध करत नाही का?
रामजी : करतो की पण ताकद कमी पडती आमची! जाऊ द्या, चला आपण! (दाखवत) त्या व्हड्या दिसतात का न्हाय तिकडं, त्या इथल्या मच्छिमारांच्या…साईड बिजनेस म्हणून लोकांना फिरवून आणण्याचं काम करतात समदे.
तुमच्यासारखी हौशी लोकं येत्यात, डोळे भरून निसर्ग बघतात, झुणका-भाकर, माशे-भात खातात आन् तृप्त होऊन जात्यात. आमचंबी पोटपाणी सुटतं...आन् ते बघा तिकडं वरच्या अंगाला... तिकडं जंगल हाय मोठं, बिबटे, चितळं, हरणं, कोल्हे, लांडगे, रानडुकरं...समदे प्राणी हायेत हितं. पूर्वी पट्टेवाला वाघबी व्हता…हळूहळू जंगलतोड व्हयाला लागली आन नाह्यसा झाला त्यो! (हलकंसं संगीत)
सुप्रिया : खरंच इतका सुंदर स्पॉट स्वप्नातही बघितला नव्हता कधी मी... आणि घर तर अगदी एखाद्या स्वप्नातल्या घरासारखं आहे हो तुमचं!
रामजी : बरं वाटलं ऐकून पोरी!
सुप्रिया : पण तुम्हाला परवानगी कशी मिळाली इतकं पाण्याला लागून बांधकाम करायची?
रामजी : परवानगी कसली घेऊन बसलासा, एक इंजनेर भाऊसाहेब हायेत त्याना खूश ठेवलं की व्हतं समदं नीट!
आदेश : पण बरं ऐकतो तुमचं तो!
रामजी : ऐकल नाय तर काय?आमी पिढ्यान् पिढ्याचे मासेमार हितले,आमची वहिवाट हाय हितं.उलट आमच्याच जागेवर धरण बांधतंय सरकार आन् आता आमालाच हुसकाया बघतंय ते! कायद्याला धरून हाय का हे सांगा तुम्ही?
आदेश : (विचारात पडलेला)
रामजी : आमच्या पाच-पंचीस पिढ्या नांदल्या इथं सुखान. आमच्या आज्यानं हे जे घर बांधलं. तेच वाढवलं आम्ही हळूहळू. ह्यात काय चुकलं आमचं?
आदेश : खरं आहे तुमचं...
रामजी : वाघाचं काळीज व्हतं आज्याचं, निस्त्या हातानं मगरी पकडायचा त्यो.

आदेश : हातानं मगरी पकडायचे?
रामजी : मग वो!
सुप्रिया : मगरी आहेत इथं?
सोनी : अगदी मायंदाळ!
सुप्रिया : (घाबरून) ओ माय गॉड! (सोनी तोंडाला पदर लावून हसते)
रामजी : तुमी घाबरू नका, मी हाय तुमची काळजी घ्याया काय झालं तं...
आदेश : असं काही बोलू नका हो, आधीच पाण्याला घाबरते ती!
रामजी : (हसत) या हिकडं, (दुसऱ्या टोकाला नेत) हे बघा, हितं फ्लेमिंगोबरूबरच बगळे, करकोचे, ढोकरी, बदकं, पाणकोंबड्या, पाणकावळे, खंड्ये, समुद्रपक्षी, शिंपी, धोबी, कवडे,राघू, कितीतरी पक्षी बघायला मिळत्याल तुमाला.
सुप्रिया : इतके पक्षी येतात इकडे?
रामजी : मग वो? त्याना कोण आवडणार? ते तं साऱ्या जगाचं मालक! मनात आलं की निघाले.त्याना काय पासपोर्ट लागत न्हाय माणसासारखा!
सुप्रिया : व्वा!
रामजी : दोनवर्षामागं सारसपण आले व्हते -
आदेश : सारस म्हणजे क्रौंच ना, काका?
रामजी : बरोबर. जोडीनं ऱ्हातात आविष्यभर ते. मधीच एखादा मेला तर दुसरा झुरून झुरून मरतो पर दुसरी जोडी जुळवत न्हाय कधी!
सुप्रिया : ओ माय गॉड, ग्रेट! आपल्याला बघायला मिळतील का ते?
रामजी : नशीब चांगलं आसंल तर दिसत्याल की!
सुप्रिया : अय्या ऽऽऽ किती मजा येईल!
रामजी : बगळे आन् पाणकावळे एकाच झाडावर कशे मजेत ऱ्हात्यात ते पण  दावतो तुमाला उद्याच्या फेरीत.
सुप्रिया : एकत्र राहतात? भांडणं होत नाही का त्यांच्यात?
रामजी : भांडण कराया ती काय माणसं हायेत व्हय? समदं यवस्थित कळतं त्यास्नी. घरटी कशी बांधायची, अंडी कवा घालायची, पिल्लं कशी वाढवायची, त्याना कवा सोडायचं. कसली चिंता नाय, प्रापर्टीची काळजी न्हाय का कुठं झेंडा लावायचा न्हाय! आला दिस आनंदात घालवायचा एवढंच त्यास्नी म्हायती.
सुप्रिया : ओ माय माय! किती वेगळं जग आहे हे! मला काहीच कल्पना नव्हती आधी! बरं झालं आली ते!
रामजी : तुमी काही म्हणा पण प्रत्येक जीवाला आतनं ओढ असती आपल्या उगमापाशी पोचण्याची...(संगीत)
सुप्रिया : पटलं अगदी, आम्ही मुळचे कोकणातले... दरवर्षी 'जाऊ जाऊ'असं चाललेलं असतं पण तो योग काही अजून येत नाही बघा...
रामजी : मनात आणलं तर काय कठीण नाय पोरी. अंडी घालायच्या काळात माशे तीन तीन हजार मैलाचा प्रवास करून बरूबर आपल्या उगमाशी पोचतात नीट. अशा टायमाला पाण्याच्या टाकीत असतील ते तर उगमाची दिशा पकडून त्या दिशेनं भिंतीवर डोस्की आपटत राहतात, म्हजी लक्षात घ्या त्यांची तडफड!
सुप्रिया : ओ रिअली!
रामजी : आणि ही तडफड का? तर जा बाबा जरा आपल्या जन्मगावी. जा आपल्या उगमापाशी, शोध घे जरा आपल्या मुळांचा, इचार कर, हो जरा शांत, समजून घे आपल्या आविष्याचं इंगित!
सुप्रिया : व्वा!
सोनी : (मध्येच) अवो, जाताय नव्हं, का बसतासा हितंच गप्पा छाटीत?
रामजी : हे काय,निघालो की!
आदेश : चला!
रामजी : थांबा, तुमास्नी एक गंमत दाखवतो.सोने, जरा मूठभर तांदूळ घे बरं इकडं.(ती रोवळीतले तांदूळ आणून देते. 'या इकडं' म्हणत रामजी त्या दोघांना घेऊन पुढे येतो आणि मुठभर तांदूळ समोर प्रेक्षकांच्या दिशेने असलेल्या कठड्याच्या पुढे जलाशयात टाकतो...प्रकाश बदलतो आणि क्षणार्धात पाण्याच्या खळबळीचा आवाज. तांदूळ खाण्यासाठी खूप मासे जमले आहेत.रामजी माहिती देत) हे बघा, हा रोहू, तो कटला आन् त्यो मरळ ...
आदेश : बघू बघू ...

सुप्रिया : ओ माय गॉड!
रामजी : ही खवल आली बघा, ही दांडी, ही पितुर्डी ...ते शिंगटं...तो वाघूर...
सोनी : ओ माय गॉड! ग्रेट, वंडरफुल ...
रामजी : (दुसरी मूठ टाकतो तेव्हा आणखी मासे आलेले).
आदेश : हा वेगळाच दिसतोय मासा.
रामजी : बराबर, हा चिलापी...
आदेश : म्हणजे तिलापिया ना?
रामजी : बरूबर... त्याला बघून पळून जातात बाकीचं समदं मासं.
सुप्रिया : ते का?
रामजी : त्याच्या अंगात काटं खूप असतात त्यामुळं त्याला खाल्लं की आतडी फाटून माशे मरतात आपल्याकडचे.
आदेश : चॅयला गंमतच आहे.
रामजी : गंमत कसली घेऊन बसलासा? आपल्याकडचा मासा न्हाय हा ! लांब कलकत्त्यावरनं आला तो हितं. त्याची एवढी पैदास झाली हितं की जिकडं बघाल तिकडं त्योच दिसंल तुमाला.आपल्याकडच्या माशांना खाऊन खाऊन खलास करत आणलं त्यानं. रूपायात चार आणे इतकंच मासं शिल्लक र्‌हायलंत आता आपल्याकडचं.
सुप्रिया : बापरे, भयंकरच म्हणायचा हा प्रकार!
सोनी : (एक गाठोडे, पाण्याची बाटली इत्यादी सामान घेऊन येते) हे घ्या!
रामजी : (सोनीला) अगं हो हो थांब, आलो म्या व्हडी घिऊन. ( प्रकाश आणखी बदलतो.संगीत येते.रामजी किचनच्या बाजूने होडी घेऊन येतो आणि ती अंगणातल्या ग्रिलजवळ उभी करतो. सोनी त्याला सारे साहित्य देते. तो ते होडीत ठेवतो. बांबू उचलतो आणि आदेश- सुप्रियाला हात देऊन आत घेतो. ते दोघे कॅमेरा, दुर्बिण, पाण्याची बाटली इत्यादीसह आत येतात.रामजी बांबूचा रेटा देतो, होडी हलते,सोनी त्याना हात हलवून निरोप देते.)
सोनी : लवकर या परत, रातीचं जेवण तयार करून ठिवते म्या...(रामजी 'हो हो' म्हणत पाण्यात बांबू घालून होडीला गती देतो.आता फक्त होडीवर प्रकाश. ती हलते.पाण्याचा चुबूक चुबूक आवाज,पक्ष्यांचा किलबिलाट. हलके संगीत. काही क्षणांनी ते थोडे वर दुसऱ्या किनाऱ्याशी पोचलेले.)
रामजी : (दाखवत) दिसले का फ्लेमिंगो पोरांनो?
सुप्रिया : अय्या कुठे?
रामजी : ते बघा की तिकडं...
आदेश : अरे हो खरंच की! केवढा मोठा थवा आहे. बा बा बा ऽऽऽ.
सुप्रिया : बघू बघू !
आदेश : ही दुर्बिण घे, म्हणजे दिसतील तुला नीट.(ती दुर्बिणीतून पाहू लागते, होडी हलत आहे. ती धडपडते.
रामजी : थांबा थांबा, (बांबूचा रेटा लावून होडी स्थिर करत) आता बघा निवांत!
आदेश : येऽस! व्वा, क्या बात है!
सुप्रिया : पंख कसे आगीसारखे लाल आहेत बघ त्यांचे.
आदेश : म्हणून तर अग्नीपंख म्हणतात त्याना.
सुप्रिया : ते बघ कसे गळ्यात गळे घालून उभे आहेत ते!
आदेश : हो खरंच की!
रामजी : (हसत) अवो त्येच बघाया येतात लोक हितं. 'हार्ट शेप' म्हणत्यात त्याला. आमच्या गावठी भाषेत 'बदाम' म्हणतो आमी.एकमेकांवरचं पिरेम आन् ईश्वास यांचं लक्षण असतंय ते!
आदेश : व्वा, क्या बात है!
सुप्रिया : आमचा दोघांचा एक फोटो काढता का काका? बॅकग्राऊंडला फ्लेमिंगो दिसले पाहिजेत – बदामवाले...
रामजी : काढतो की! द्या तो कॅमेरा हिकडं.
रामजी : (त्यांना ॲडजेस्ट करत दोन तीन फोटो काढतो आणि हसत) आता तुमीपण बदाम करा की, काढतो एखादा फोटू तसा!
सुप्रिया : (हसत) ग्रेट आयडिया! कमॉन आदेश!
आदेश : (सुप्रियाला) चांगलीच फॉर्मात आलीस की तू! (ती खिदळत आदेशच्या गळ्यात हात घालते.)

रामजी : वा, झकास जमतंय की अगदी!
आदेश : (रामजीला) काय रामजीकाका चेष्टा करताय!
रामजी : त्यात कसली आलीय चष्टा? हितं ती कालिजातली पोरं येऊन दिसभर हेच करत बसतात का न्हाय! चला, चला...रेडी? ( आसं उभं र्‌हावा, हा हात हिकडं घ्या, तुमी एक हात वरनं टाका अशा एकेक सूचना करत राहतो . त्या दोघांच्या एकत्र येण्यातून एक सुंदर  हार्टशेप तयार होतो, रामजी फोटो काढू लागतो,फ्लॅश चमकतो, क्लिक् क्लिक् आवाज. एक दर्दभरा आलाप...हळूहळू अंधार. मध्यंतर.)

***

(आपल्याला पूर्ण नाटक वाचायचे असेल तर वर दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा!)

***